HCC

HCC/SEC/EGM/2025 February 20, 2025

| **BSE Limited** | **National Stock Exchange of India Ltd.** |
|---|---|
| The Corporate Relationship Dept, | Exchange Plaza, |
| Phiroze Jeejeebhoy Towers, | Bandra-Kurla Complex, |
| Dalal Street, | Bandra (East), |
| Mumbai-400 001. | Mumbai-400 051. |
| Scrip Code : 500185 | Scrip Code : HCC |

Dear Sir/Madam,

**Sub : <u>Publication of Notice in Newspapers regarding Notice of Extra-Ordinary General Meeting of the Company</u>**

**Ref : <u>Regulation 30 and Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015</u>**

Pursuant to Regulation 47 read with Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are enclosing a copy of Notice in connection with the Extra-Ordinary General Meeting of the Company published in the newspapers viz. “Business Standard” (English) and “Sakal” (Marathi) on February 20, 2025.

We request you to kindly take the above on your record.

Yours sincerely,
**For Hindustan Construction Company Ltd.**

NITESH KUMAR JHA

Digitally signed by NITESH KUMAR JHA
DN: c=IN, o=PERSONAL, title=1979, pseudonym=ebcd2c690280495281de1c520fcccf9f, 2.5.4.20=85a282acf1b74a6ba8d538e01089e6d1b58b675e59040a9af4e4f835f71cc335, postalCode=410210, st=Maharashtra, serialNumber=ea422f12d8f4e8778bf2857e9d6c0509df9788526f7246d5a89164fa23df53e6, cn=NITESH KUMAR JHA
Date: 2025.02.20 14:58:57 +05'30'

**Nitesh Kumar Jha**
**Company Secretary**

Encl: As above

**Hindustan Construction Co Ltd**
Hincon House,
LBS Marg, Vikhroli (West),
Mumbai - 400 083, India
Tel : +91 22 2575 1000 Fax : +91 22 2577 7568
CIN : L45200MH1926PLC001228

# NOTICE OF EXTRA ORDINARY GENERAL MEETING, E-VOTING

Notice is hereby given that Extra Ordinary General Meeting (EGM) of the Members of Hindustan Construction Company Ltd. will be held on Thursday, March 13, 2025 at 11.00 a.m. through Video Conferencing **('VC')** / Other Audio Visual Means **('OAVM')** as set out in the Notice of the EGM in compliance with applicable provisions of the Companies Act, 2013 ('the Act') and Rules framed thereunder and the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (the SEBI LODR Regulations) read with General Circular numbers 14/2020, 17/2020, 20/2020, 10/2022, 09/2023 and 09/2024 dated April 08, 2020, April 13, 2020, May 05, 2020, December 28, 2022, September 25, 2023 and September 19, 2024 respectively issued by the Ministry of Corporate Affairs (Collectively referred to as 'MCA Circulars'), without the presence of the Members at the common venue.

In compliance with above MCA Circulars, and the SEBI Circulars No. SEBI/HO/CFD/CFD/PoD-2/P/CIR/2024/133 dated October 03, 2024 the Company has sent the Notice of the EGM on February 19, 2025 through electronic mode only to those Members whose e-mail addresses are registered with the Company or Registrar & Transfer Agents and Depositories. The requirement of sending physical copies of the Notice of the EGM has been dispensed with vide MCA and SEBI Circulars referred above.

The EGM Notice is available on the website of the Company at www.hccindia.com and on the websites of the Stock Exchanges viz.www.bseindia.com and www.nseindia.com. A copy of the same is also available on the website of National Securities Depository Limited (NSDL) at www.evoting.nsdl.com.

In compliance with Section 108 of the Act read with Rule 20 of the Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended from time to time, the Secretarial Standards on General Meetings (SS-2) issued by the Institute of Company Secretaries of India and sub-clause (1) & (2) of Regulation 44 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (SEBI LODR Regulations) the Company is providing to its Members the facility of remote e-Voting before as well as during the EGM in respect of the business to be transacted at the EGM and for this purpose, the Company has engaged the services of NSDL for facilitating voting through electronic means.

The Members may cast their votes using an electronic voting system from a place other than venue of the EGM ('remote e-voting'). The remote e-voting period will commence on Sunday, March 09, 2025, (9.00 a.m.) and will end on Wednesday, March 12, 2025 (5.00 p.m.). During this period, Members of the Company, holding shares either in physical form or in dematerialized form, as on Thursday, March 06, 2025 (''Cut-Off Date''), may cast their vote by remote e-Voting.

The detailed instructions for remote e-Voting are given in the Notice of the EGM. Members are requested to note the following:

a. The remote e-Voting facility shall be available during the following period:

| | |
|---|---|
| Commencement of remote e-Voting | From 9.00 a.m. on Sunday, March 09, 2025 |
| End of remote e- Voting | Upto 5.00 p.m. on Wednesday, March 12, 2025 |

The remote e-Voting module shall be disabled by NSDL for voting thereafter.

b. The voting rights of the Members shall be in proportion to their share of the paid-up equity share capital of the Company as on Thursday, March 06, 2025 (''Cut-Off Date''). The facility of e-Voting system shall also be made available during the Meeting and the Members attending the Meeting, who have not already cast their vote by remote e-Voting shall be able to exercise their right during the Meeting. A person whose name is recorded in the Register of Members / Register of Beneficial Owners as on the Cut-Off Date only shall be entitled to avail the facility of remote e-Voting/e-Voting before and during the EGM;

c. Any person holding shares in physical form and non-individual shareholders who acquires shares of the Company and becomes a Member of the Company after the email of the Notice and holds shares as on the Cut-Off Date, may obtain the login-id and password for remote e-Voting by sending a request at evoting@nsdl.com or may contact on toll free nos. 022-4886 7000, as provided by NSDL. However, if you are already registered with NSDL for remote e-voting, then you can use your existing user ID and password for casting your vote. If you forgot your password, you can reset your password by using 'Forgot User Details/Password' or ''Physical User Reset Password'' option available on www.evoting.nsdl.com or call on toll free nos. 022-4886 7000. In case of Individual Shareholders holding securities in demat mode who acquires shares of the Company and becomes a Member of the Company after sending of the Notice and holding shares as of the cut-off date i.e. Thursday, March 06, 2025 may follow steps mentioned in the Notice of the EGM under ''Access to NSDL e-Voting system''.

A person who is not a Member as on the Cut-Off Date should treat the Notice of the EGM for information purposes only.

The Members of the Company holding shares in physical/demat form and who have not registered/ updated their e-mail addresses with the Company/Registrar & Transfer Agents (''the Registrar'')/ Depository Participants (''the DPs'') are requested to send the following documents/information via e-mail to secretarial@hccindia.com in order to register/update their e-mail addresses and to obtain user id & password to cast their vote through remote e-voting or e-voting at the EGM:

- Name registered in the records of the Company
- E-mail id and Mobile number
- DPID-Client ID, Client Master Copy or Copy of Consolidated Account Statement (For Shares held in demat mode)
- Scanned copy of the share certificate front and back (For Shares held in physical mode)
- Self-attested scanned copy PAN and Aadhar.

In case Members have any queries relating to e-Voting, they are requested to refer the 'Frequently Asked Questions (FAQs) for Members' and 'Remote e-voting User Manual for Members' available at the downloads section of www.evoting.nsdl.com or call on 022-4886 7000 or send a request at evoting@nsdl.com. Members may also send their queries relating to e-Voting to Ms. Pallavi Mhatre, Senior Manager, NSDL, 301, 3rd Floor, Naman Chambers, G Block, Plot No. C-32, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai - 400051 at: E-mail id: evoting@nsdl.com; Contact No.: 022-4886 7000.

Members facing any technical issue in login before/during the AGM can contact NSDL helpdesk by sending a request at evoting@nsdl.com or call at 022-4886 7000.

The Results declared along with the report of the Scrutinizer shall be placed on the website of the Company www.hccindia.com and on the website of NSDL https://www.evoting.nsdl.com immediately after the declaration of result by the Chairman or a person authorized by him in writing. The results shall also be uploaded on the websites of stock exchanges www.bseindia.com and www.nseindia.com respectively.

By Order of the Board Directors
For **Hindustan Construction Co. Ltd.**
Sd/-
**Nitesh Kumar Jha**
Company Secretary

Dated: February 19, 2025
Place: Mumbai

HCC

www.hccindia.com

**Hindustan Construction Co. Ltd.**
Registered Office: Hincon House, Lal Bahadur Shastri Marg, Vikhroli (West), Mumbai 400 083, India.
Tel: +91 22 2575 1000 Fax: +91 22 2577 7568
CIN: L45200MH1926PLC001228

## दृष्टिक्षेपात

### बिबट्याची चार पिल्ले अखेर आईच्या कुशीत

कुसूर(जि.सातारा) : ऊसतोडणी सुरू असताना चचेगाव (ता. कऱ्हाड) येथील शेतात आढळून आलेल्या बिबट्याच्या चार पिल्लांची बिबट्या मादीसोबत भेट घडवून आणण्यात वन विभाग व कऱ्हाड वाईल्ड हार्ट रेस्क्यूअर नाईट टीमला रात्री उशिरा यश आले. ऊसतोड मजुरांना ग्रामपंचायत सदस्य राहुल पवार यांच्या शेतात ही पिल्ले आढळली होती.

### महाशिवरात्री यात्रेची औंढ्यात तयारी

हिंगोली : औंढा नागनाथ येथे महाशिवरात्री उत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे. प्रभू नागनाथाच्या मंदिर परिसराची रंगरंगोटी, रोषणाईची कामे केली जात आहेत. सोमवारपासून (ता.२४) यात्रा महोत्सवाला सुरवात होणार आहे. यात्रा एक मार्चपर्यंत चालेल.

### फरार नक्षलवाद्याला ठोकल्या बेड्या

यवतमाळ : गेल्या वीस वर्षांपासून यवतमाळ जिल्ह्यात वास्तव्य करणारा नक्षलवादी तुलसी ऊर्फ दिलीप महतो याला स्थानिक गुन्हे शाखेने शहरातील राणी सती मंदिर परिसरातून ताब्यात घेतले. त्याच्यावर झारखंडमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंद आहे.

### अमेरिकेचे दूत युक्रेनमध्ये दाखल

किव्ह : युक्रेन आणि रशियामधील युद्धसमाप्तीसाठी अमेरिकेने जोरदार प्रयत्न सुरू केले असून या कामासाठी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नेमलेले विशेष दूत केथ केलॉग हे आज युक्रेनची राजधानी किव्ह येथे दाखल झाले. शांतता चर्चेपासून रशियाला दूर ठेवण्याचे अमेरिकेचे आधीचे धोरण ट्रम्प यांनी बदलले आहे. रशिया-युक्रेन युद्धाला युक्रेनच जबाबदार असल्याचे ट्रम्प यांचे मत आहे. सौदीमध्ये युद्धाबाबत झालेल्या बैठकीतही युक्रेनला वगळण्यात आले होते.

### बोल्सोनारोंवर आरोपपत्र दाखल

रिओ दी जानेरो : निवडणुकीत पराभूत झाल्यानंतरही सत्तेवर टिकून राहण्यासाठी बंड करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी ब्राझीलचे माजी अध्यक्ष जेर बोल्सोनारो यांच्याविरोधात आज न्यायालयात आरोपपत्र दाखल झाले आहे. आपले राजकीय विरोधक आणि विद्यमान अध्यक्ष लुला दा सिल्वा यांच्यावर विषप्रयोग करण्याचा आणि सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची हत्या करण्याचा कट रचल्याचाही आरोप बोल्सोनारो यांच्यावर ठेवण्यात आला आहे. आरोपपत्र दाखल झाल्याने बोल्सोनारो यांच्यावर आता खटला सुरू होणार आहे.

### लहान मुलांसाठी आता वकील नाही

वॉशिंग्टन : बेकायदा स्थलांतरितांना देशाबाहेर काढण्याची मोहीम राबवीत असलेल्या अमेरिकेतील ट्रम्प प्रशासनाने स्थलांतरितांमधील अल्पवयीनांना दिली जाणारी कायदेशीर मदत थांबविण्याचा निर्णय घेतला आहे. पालकांशिवाय एकट्यानेच अमेरिकेत प्रवेश केलेल्यांसाठी हा निर्णय लागू करण्यात आला आहे. या निर्णयामुळे हस्तांतराविरोधात लढताना वकीलांचे शुल्क ज्यांना परवडत नाही, त्यांच्यासमोर मोठी अडचण निर्माण झाली असल्याचे मानवतावादी संघटनांनी सांगितले. सरकारने आतापर्यंत २६ हजार अल्पवयीनांना वकील पुरविले होते.

# पनामात ३०० स्थलांतरित

## भारतीयांचाही समावेश; मायदेशी पाठविण्याचे प्रयत्न

पनामा सिटी, ता. १९ (पीटीआय) : बेकायदा वास्तव्याबद्दल अमेरिकेने देशाबाहेर काढलेल्या, मात्र संबंधित देशांमध्ये पाठविण्याची सोय न झालेल्या सुमारे ३०० स्थलांतरितांना पनामा देशातील एका हॉटेलमध्ये ठेवण्यात आले आहे. या स्थलांतरितांमध्ये काही भारतीय व्यक्तीही आहेत. यापैकी कोणालाही हॉटेलबाहेर पडण्यास मनाई करण्यात आली असल्याने ते अडकून पडले आहेत. या सर्वांना मायदेशी पाठविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे पनामामधील अधिकाऱ्यांनी सांगितले.

स्थलांतरितांना थेट त्यांच्या देशामध्ये पाठविण्यात अमेरिकेला काही अडचणी येत असल्याने त्यांनी पनामाबरोबर करार करून काही स्थलांतरितांना या देशात आणून सोडले आहे. कोस्टारिकाबरोबरही अमेरिकेने असाच करार केला आहे. पनामाने या स्थलांतरितांना केवळ आश्रय दिला असून या सर्वांना मायदेशात पाठविण्याची सोय अमेरिका किंवा इतर आंतरराष्ट्रीय संघटना करणार आहेत. हे स्थलांतरित इराण, भारत, नेपाळ, श्रीलंका, पाकिस्तान, अफगाणिस्तान, चीन आणि इतर आशियाई देशांमधील आहेत. या सर्वांना अन्न व वैद्यकीय सेवा पुरविली जात आहे.

पनामा कालवा पुन्हा ताब्यात घेण्याची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली असल्याने हा देश सध्या दबावाखाली आहे. त्यामुळेच त्यांनी स्थलांतरितांना तात्पुरता आश्रय देण्याची तयारी दर्शविली असल्याचे अमेरिकेतील माध्यमांनी म्हटले आहे.



पनामा सिटी : हॉटेलमध्ये अडकून पडलेले नागरिक मदतीची याचना करताना.

### मदतीसाठी याचना

स्थलांतरितांना पनामा देशामध्ये कोणत्याही वैध कागपदत्रांशिवाय फार दिवस ठेवता येणे शक्य नसल्याने कायदेशीर अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. अनेक स्थलांतरित व्यक्ती त्यांच्या खोल्यांमधील काचांवर 'मदत करा' असा मजकूर लिहीत आहेत. 'आमच्या देशात आम्ही सुरक्षित नाहीत', असेही काही जणांनी काचांवर लिहिले आहे. स्थलांतरितांपैकी ४० टक्के जणांना मायदेशी परतायचे नसल्याचे पनामाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## केंद्राचे पाच राज्यांना एक हजार ५५४ कोटी

नवी दिल्ली, ता. १९ (पीटीआय) : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखालील समितीने नैसर्गिक आपत्ती प्रतिसाद निधीतून (एनडीआरएफ) पाच राज्यांना आज तब्बल १५५४.९९ कोटी रुपयांची अतिरिक्त मदत देण्यास मान्यता दिली आहे. या राज्यांना मागील वर्षी महापूर, अतिवृष्टी, भूस्खलन आणि वादळांचा जबर तडाखा बसला होता.

गृहमंत्री शहा यांनी 'एक्स'वर नोंदविलेल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे की केंद्रातील मोदी सरकार हे आपत्तीग्रस्तांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. त्यामुळेच पाच राज्यांना हा निधी देण्यात आला आहे. याआधीही केंद्राने २७ राज्यांना १८ हजार ३२२.८० कोटी रुपयांचा निधी जाहीर केला होता, त्यात ही आणखी भर असेल.

या राज्यांना नैसर्गिक आपत्तीचा तडाखा बसल्यानंतर केंद्र सरकारने तातडीने आंतरमंत्रालयीन केंद्रीय पथके नेमली होती. यासाठी कोणत्याही प्रस्तावाची वाट पाहण्यात आली नव्हती असेही सरकारने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# पाककडून दहशतवादाबाबत स्वतःचीच पाठ थोपटणे सुरू

## भारताची टीका; पाक दहशतवादाचे केंद्र

संयुक्त राष्ट्र, ता. १९ (पीटीआय) : ''जैश-ए-मोहम्मद'सारख्या दहशतवादी संघटनेच्या दहशतवादी कारवायांमुळे निष्पाप भारतीय बळी ठरले आहेत. पाकिस्तान त्याला सातत्याने चिथावणी देत आहे. मात्र, विसंगत अन् हास्यास्पद बाब म्हणजे जागतिक दहशतवादाचे केंद्र असलेला पाकिस्तान संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या बैठकीत या दहशतवादाशी आपण संघर्ष करत आहोत, असा दावा करून स्वतःचीच पाठ थोपटून घेत आहे,'' अशा ठाम शब्दांत चीनच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा बैठकीत भारतीय प्रतिनिधींनी पाकिस्तानला सुनावले.

चीनच्या अध्यक्षतेखाली सुरक्षा परिषदेत 'बहुविधतेची अंमलबजावणी, जागतिक प्रशासन यंत्रणांतील कालसुसंगत योग्य बदल, सुधारणा' या विषयावर मंगळवारी झालेल्या खुल्या चर्चेत पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री मोहम्मद इशाक दार यांनी जम्मू-काश्मीरबद्दल केलेल्या वक्तव्याला संयुक्त राष्ट्रातील भारताचे स्थायी प्रतिनिधी पार्वतानेनी हरीश यांनी कडक शब्दांत प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, की संयुक्त राष्ट्रांनी सूचिबद्ध केलेल्या पाकिस्तान हा २० हून अधिक दहशतवादी संघटनांना आश्रय देणारा दहशतवादाचा जागतिक केंद्रबिंदू आहे.

हरीश म्हणाले, की पाकिस्तानच्या चुकीच्या अन् खोटारडेपणामुळे वास्तव अजिबात बदलत नाही. गेल्या वर्षी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांचा संदर्भ देत हरीश यांनी सांगितले, की जम्मू-काश्मीरवासीयांनी निवडणुकीत भाग घेतला आणि सरकार निवडण्यासाठी मोठ्या संख्येने मतदान केले. जम्मू-काश्मीरवासीयांचा निर्णय जगाला निसंदिग्ध संदेश देणारा आहे.



प्रयागराज : महाकुंभमेळ्यात माघ पौर्णिमेला गंगेत अमृत स्नानाची पर्वणी लाखो भाविकांनी साधली. त्यावेळी जलपूजनातील नारळ आणि अन्य साहित्य नदीत साचले होते.

# पाणी स्नानासाठी अयोग्य

## प्रयागराजबाबत केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचा अहवाल

नवी दिल्ली, ता.१९ (वृत्तसंस्था) : प्रयागराजमधील महाकुंभमेळ्यात आतापर्यंत ५६ कोटीपेक्षा जास्त भाविकांनी गंगा आणि यमुनेच्या संगमावर स्नानाची पर्वणी साधली आहे. अशावेळी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) नदीच्या पाण्याची तपासणी केली. जलप्रदूषणाला कारणीभूत विष्ठेतील विषाणूंचे प्रमाण चिंताजनक पातळीवर असल्याचे 'सीपीसीबी'ने राष्ट्रीय हरित लवादाला कळविले; मात्र या दोन्ही नद्यांमधील पाणी प्रदूषण नियंत्रणाच्या मानकांप्रमाणे असल्याचा दावा उत्तर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाने केला.

गंगेतील प्रदूषणासंबंधीचा अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने 'एनजीटी'च्या प्रमुख खंडपीठाकडे सोपविला आहे. नदीतील पाण्यात विष्ठेतील विषाणूंचे प्रमाण वाढल्याने स्नान करण्यासाठी ते योग्य नाही, असे अहवालात म्हटले आहे. अमृत स्नानाच्या दिवसांसह दररोज हजारोंच्या संख्येने भाविक पवित्र स्नान करीत आहेत. यामुळे पाण्यात विष्ठा मिसळल्याचे दिसून आले आहे.

### संगमातील पाणी पिण्यायोग्य!

गंगा आणि यमुनेच्या संगमातील पाणी हे पिण्यायोग्य असल्याचा दावा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केला आहे. गंगेच्या पाण्यामध्ये मानवी विष्ठा मिसळल्याचा आरोप विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केला होता तसेच त्रिवेणी संगमातील पाणी हे स्नान करण्यायोग्य नसल्याचा अहवाल हरित लवादाने केला होता. त्यावर योगींनी स्पष्टीकरण दिले.

## 'महाकुंभमेळ्यामुळे तीन लाख कोटी रुपयांची उलाढाल'

**अभय सुपेकर :** सकाळ वृत्तसेवा

प्रयागराज, ता. १९ : येथे भरलेल्या महाकुंभने केवळ भाविकांनाच एकत्र आणलेले नाही, तर अर्थव्यवस्थेला मोठी चालना दिली आहे. प्रयागराज आणि दीडशे किलोमीटर परिसरातील अर्थकारणात त्यामुळे गती आलेली आहे, असा दावा कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन ट्रेडर्सने केलेला आहे.

महाकुंभमुळे प्रयागराजसह शेजारील वाराणसी, अयोध्या यांसह अनेक मोठ्या ऐतिहासिक आणि पौराणिक शहरांना तसेच आसपासच्या गावांत रोजगाराला चालना मिळालेली आहे. फेडरेशनच्या अंदाजानुसार, या महाकुंभमुळे सुमारे तीन लाख कोटी रुपयांची उलाढाल झालेली असावी. या दाव्यात अतिशयोक्ती आहे, असे जरी गृहीत धरले तरीही या परिसरात तसेच उत्तर प्रदेश राज्याच्या अर्थकारणात भरीव भर घालण्याचे कार्य महाकुंभने केले, हे मात्र निश्चित जाणवते.

उत्तर प्रदेशच्या माहिती विभागानेही या दाव्याला पुष्टी दिलेली आहे. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन ट्रेडर्सचे सरचिटणीस आणि खासदार प्रवीण खंडेलवाल यांनीही तसा दावा करत असतानाच, श्रद्धा आणि अर्थकारणाचा अन्योन्य संबंध अधोरेखित केला. महाकुंभने आध्यात्मिक आणि अन्य पर्यटनाने अर्थकारण गतिमान झाले.

# आयुक्तांच्या नियुक्तीसाठी सुनावणी पुढे

नवी दिल्ली, ता. १९ : मुख्य निवडणूक आयुक्त तसेच निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती संदर्भातील कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी टळली आहे. सदर याचिकेची बुधवारी प्राधान्याने सुनावणी घेतली जाईल, असे याआधी झालेल्या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने सांगितले होते. मात्र ही याचिका पटलावर येऊ शकली नाही.

मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांची नेमणूक करण्यासाठी केंद्र सरकारने दोन वर्षांपूर्वी कायदा केला होता. त्यानंतर गतवर्षीच्या डिसेंबर महिन्यात हा कायदा लागू करण्यात आला होता. निवडणूक आयुक्तांच्या नियुक्त्यांमध्ये महत्त्वपूर्ण बदल या कायद्याद्वारे करण्यात आले होते.

# पर्यटनवाढीसाठी नाशिकच्या पथकाचा अभ्यास

प्रयागराज, ता. १९ : प्रयागराज येथे महाकुंभमेळ्यासाठी भारतीय रेल्वेने विशेष रेल्वेगाड्या सोडल्या होत्या. या रेल्वेंचे व्यवस्थापन आणि प्रयाग रेल्वेस्थानकावरील गर्दीचे व्यवस्थापन या अनुषंगाने नाशिकच्या पथकाने अभ्यास केला. पथकातील अधिकाऱ्यांनी स्थानिक प्रशासनाशी संवाद साधताना तेथील कलाग्राम व अन्य पर्यटनस्थळांना भेट देत पाहणी केली. तसेच पर्यटनवाढीसाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती जाणून घेतली.

नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये भरणाऱ्या कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी नाशिकमधील वीस जणांचे पथक प्रयागराजच्या अभ्यास दौऱ्यावर गेले आहे. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक तेथील व्यवस्था जाणून घेत आहे. पथकाने दुसऱ्या दिवशी रेल्वे स्थानकाची पाहणी करत तेथील अधिकाऱ्यांशी संवाद साधला. प्रयागराज कुंभमेळ्यात महामार्ग व हवाईमार्गाप्रमाणेच रेल्वेमार्गाने लाखो भाविक दाखल झाले. त्यामुळे भाविकांसाठी सोडण्यात आलेल्या विशेष रेल्वेगाड्या, देशभरातून दाखल होणाऱ्या रेल्वे गाड्यांची पार्किंगची व्यवस्था, रेल्वे ट्रॅफिकची हाताळणी, फलाटांवरील गर्दीचे नियोजन आदींबाबत या पथकाने माहिती करून घेतली.

# 'केशवकुंज'चे राजधानीत उद्घाटन

## संघाचे दुसरे महत्त्वाचे कार्यालय

नवी दिल्ली, ता. १९ : छत्रपती शिवाजी महाराज तसेच द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांच्या जयंतीचा मुहूर्त साधून आज राजधानी दिल्लीतील झंडेवाला भागात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या बारा मजल्यांच्या तीन इमारतींचा समावेश असलेल्या 'केशवकुंज' परिसराचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी उद्घाटन केले.

यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा तसेच सहकार्यवाह दत्तात्रय होसबळे आणि संघाचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे यंदा शताब्दी वर्ष पूर्ण होत असून देशभरातील संघाची सर्व कार्यालये बदललेल्या काळानुसार आधुनिक करण्यावर भर देण्यात आला आहे. त्याच मालिकेतील दिल्लीतील संघाच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. दीडशे कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या केशवकुंजचे सरसंघचालक भागवत यांनी १४ नोव्हेंबर २०१६ रोजी भूमिपूजन केले होते.



नवी दिल्ली : संघाच्या केशवकुंज कार्यालयाचे बुधवारी अनावरण करण्यात आले.

# फिरत्या चाकांवर मराठी भाषेचा उत्सव

पुणे, ता. १७ : रेल्वे स्थानकावरच्या उद्घोषणांना छेदणारा ढोल-ताशांचा निनाद, 'जय हरी विठ्ठल... ज्ञानोबा-तुकाराम'चा गजर, फुलांची मुक्त उधळण, तोरणाने सजविलेले दरवाजे, साहित्य रसिकांची चाललेली लगीनघाई. कुठे कवी संमेलन भरलेले, तर कुठे महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेचे सादरीकरण करणारे लोककलाकार, तर कुठे तरुण-तरुणींना भावणारा स्टँडअप कॉमेडी, असा मराठी भाषेचा आविष्कार अनुभवता आला. निमित्त होते मराठी साहित्ययात्री संमेलनाचे. बुधवारी दुपारी पुणे रेल्वे स्थानकावरून साहित्यनगरीकडे 'महादजी शिंदे विशेष रेल्वे' रवाना झाली.

सरहद, पुणे आणि अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळातर्फे दिल्ली येथे ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित केले आहे. या निमित्त रेल्वेच्या डब्यातच मराठी साहित्ययात्री संमेलनाचे आयोजन केले आहे. पुणे ते दिल्ली प्रवासादरम्यान फिरत्या चाकांवर प्रवासी साहित्य संमेलन आयोजित केले आहे. मुख्य संमेलनानिमित्त रेल्वेत होणारे हे मराठीतील पहिलेच, तसेच जगातील सर्वांत मोठे व दीर्घ संमेलन आहे. पुण्यातून दिल्लीला जाणाऱ्या विशेष रेल्वेला महान सेनानी महादजी शिंदे यांचे नाव दिले आहे. प्रत्येक डब्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गड-किल्ल्यांची नावे दिली आहेत.

सहायक प्राध्यापक पदासाठी
राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट)
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
महाराष्ट्र शासन व गोवा शासन प्राधिकृत आणि यु.जी.सी., नवी दिल्ली
मान्यताप्राप्त नोडल एजन्सी आयोजित

४० व्या सेट परीक्षेची तारीख : रविवार, दि. १५ जून, २०२५
ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची मुदत : २४ फेब्रुवारी, २०२५ ते १३ मार्च, २०२५
विलंब शुल्कासहीत अर्ज भरण्याची मुदत : १४ मार्च, २०२५ ते २१ मार्च, २०२५

सेट परीक्षेचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्यासंबंधीची व या परीक्षेची संपूर्ण माहिती पुढील संकेतस्थळावर (https://setexam.unipune.ac.in) दि. २४.०२.२०२५ पासून उपलब्ध होईल.

जाहिरात क्र. ०४
दि .२०/०२/२०२५
प्रा. (डॉ.) ज्योती भाकरे
प्रभारी कुलसचिव तथा सदस्य सचिव (सेट)

कंपनीची विशेष सर्वसाधारण सभा, ई–मतदानाची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एकत्रितपणे 'एमसीएची परिपत्रके' म्हणून उल्लेखलेली) जारी केलेली सर्वसाधारण परिपत्रके 14/2020, 17/2020, 20/2020, 10/2022, 09/2023 आणि 09/2024 अनुक्रमे दिनांक 08 एप्रिल 2020, 13 एप्रिल 2020, 05 मे 2020, 28 डिसेंबर 2022, 25 सप्टेंबर 2023 आणि 19 सप्टेंबर 2024 सोबत वाचले असता कंपनी कायदा 2013 (कायदा) मधील लागू तरतूदी आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेले नियम आणि सेबी (सूचिबद्धता बंधन आणि प्रकटीकरणाच्या आवश्यकता) आणि नियम 2015 (सेबी एलओडीआर नियम) यांची पूर्तता करताना ईजीएमच्या सुचनेत नमूद केल्याप्रमाणे हिंदुस्तान कंस्ट्रक्शन कंपनी लिमिटेडच्या सदस्यांची विशेष सर्वसाधारण सभा (ईजीएम) गुरूवार, 13 मार्च 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता सामायिक ठिकाणी सदस्यांनी प्रत्यक्ष उपस्थित न राहता, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हिसी')/ इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे ('ओएव्हिएम') घेण्यात येईल.

वरील एमसीएच्या परिपत्रकांनुसार आणि दि. 03 ऑक्टोबर 2024 रोजी जारी केलेले सेबीचे परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CFD/PoD-2/P/CIR/2024/133 ची पूर्तता करताना, कंपनीने ज्यांचा ई–मेलचा पत्ता कंपनीकडे/रजिस्ट्रार व हस्तांतरण एजंटस आणि डिपॉझिटरी यांच्याकडे नोंदविण्यात आला आहे, अशा सदस्यांना ईजीएमची सुचना 19 फेब्रुवारी, 2025 रोजी इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठविली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे एमसीएच्या परिपत्रकानुसार ईजीएमच्या सूचनेची छापील प्रत पाठविण्याची आवश्यकता नाही.

ईजीएमजी सूचना कंपनीच्या संकेतस्थळावर www.hccindia.com येथे आणि स्टॉक एक्सचेंजसच्या संकेतस्थळावर म्हणजे www.bseindia.com येथे आणि www.nseindia.com येथे उपलब्ध आहे. त्याची प्रत नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) यांचे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com येथेही उपलब्ध आहे.

वेळोवेळी सुधारणा केलेल्या कंपनी नियम 20, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम 2014 यासोबत वाचले असता, कायद्यातील कलम 108 ची पूर्तता करताना; इन्स्टिट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारा जारी करण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेसंबंधी सेक्रेटरीयल स्टँडर्ड (एसएस–2) आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स आणि डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) नियम 44चे उपकलम (1) आणि (2), 2015 (''सेबी एलओडीआर रेग्युलेशन्स'') च्या अन्वये कंपनीने आपल्या सभासदांना ईजीएममध्ये करण्यात येणाऱ्या ठरावांसाठी ईजीएमच्या अगोदर दूरस्थ ई–मतदान आणि त्याचप्रमाणे ईजीएमच्या दरम्यान ई–मतदान सुविधा उपलब्ध करुन दिली आहे आणि कंपनीने ईलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एनएसडीएलच्या सेवांचा लाभ घेतला आहे.

सदस्य ईजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणांहून इलेक्ट्रॉनिक यंत्रणेचा उपयोग करून त्यांचे मतदान करु शकतात. ('दूरस्थ ई–मतदान'). दूरस्थ ई–मतदानाचा कालावधी रविवार दि. 09 मार्च, 2025 (सकाळी 9.00 वाजता) रोजी सुरु होईल आणि बुधवार दि. 12 मार्च, 2025 (सायंकाळी 5.00 वाजता) रोजी संपेल. ह्या कालावधीत गुरूवार दि. 06 मार्च, 2025 रोजी (''अंतिम मुदतीची तारीख'') कंपनीचे छापील स्वरुपातील किंवा डिमॅट स्वरुपातील समभाग धारण करणारे सदस्य, दूरस्थ ई–मतदान पध्दतीने त्यांचे मतदान करु शकतील. दूरस्थ ई–मतदानासंबंधी करावयाच्या तपशीलवार सूचना ईजीएमच्या सूचनेत देण्यात आल्या आहेत. सभासदांनी खालील गोष्टींची नोंद घ्यावी.

ए. खालील कालावधीत ई–मतदानाची सुविधा उपलब्ध असेल.

| | |
|---|---|
| दूरस्थ ई–मतदान सुरु होईल | रविवार दि. 09 मार्च, 2025 सकाळी 9.00 वाजल्यापासून |
| दूरस्थ ई–मतदान बंद होईल | बुधवार दि. 12 मार्च, 2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |

त्यानंतर एनएसडीएल द्वारा ई–मतदान सुविधा बंद करण्यात येईल.

बी. सदस्यांचे ई–मतदानाचे अधिकार त्यांनी गुरूवार, दि. 06 मार्च, 2025 (''अंतिम मुदतीची तारीख'') रोजी धारण केलेल्या कंपनीच्या भरणा केलेल्या समभाग भांडवलाच्या त्यांच्या हिश्याच्या प्रमाणात असतील. दुरस्थ ई–मतदान यंत्रणेची सुविधा सभेच्या दरम्यान देखील उपलब्ध असेल आणि सभेला उपस्थित राहणारे, ज्यांनी दूरस्थ ई–मतदान पध्दतीने मतदान केले नाही असे सदस्य सभेच्या दरम्यान त्यांचा मतदानाचा अधिकार बजावू शकतील. अंतिम मुदतीच्या तारखेला ज्यांचे नाव सदस्यांचे रजिस्टर/लाभधारक मालकांचे रजिस्टरमध्ये नोंदविण्यात आले आहे, अशीच व्यक्ती ईजीएमच्या अगोदर आणि दरम्यान दूरस्थ ई–मतदान/ई–मतदान सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असेल.

सी. ई–मेलने सूचना पाठविण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीपाशी छापील स्वरुपातील समभाग असल्यास आणि वैयक्तिक नसलेल्या भागधारकांनी कंपनीचे समभाग विकत घेतले आणि कंपनीचे सभासद बनल्यास आणि अंतिम मुदतीच्या तारखेला त्यांच्यापाशी समभाग असल्यास, ते एनएसडीएलने उपलब्ध करुन दिलेल्या evoting@nsdl.com ह्या ई–मेलवर विनंती पाठवून किंवा टोल फ्री क्रमांक 022–4886 7000 येथे संपर्क साधून दूरस्थ ई–मतदानासाठी लॉग–इन–आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात. परंतु, तुम्ही दूरस्थ ई–मतदानासाठी एनएसडीएल यांच्यापाशी अगोदरच नोंदणी केली असल्यास, तुम्ही सध्या असलेल्या युजर आयडी आणि पासवर्डचा मतदान करण्यासाठी उपयोग करु शकता. तुमचा पासवर्ड विसरल्यास, तुम्ही www.evoting.nsdl.com येथे उपलब्ध असलेल्या 'युजर तपशील/पासवर्ड विसरला' किंवा 'छापील युजर रिसेट पासवर्ड' पर्याय वापरुन किंवा टोल फ्री क्रमांक 022–4886 7000 येथे संपर्क साधू शकता. सूचना पाठविण्यात आल्यानंतर एखाद्या व्यक्तीने समभाग विकत घेतल्यास आणि आणि कंपनीचे सदस्य बनल्यास आणि गुरूवार, दि. 06 मार्च, 2025 ह्या अंतिम मुदतीच्या तारखेला त्या भागधारकापाशी डिमॅट स्वरुपात सिक्युरिटीज असल्यास, त्या व्यक्तीने ईजीएमच्या सूचनेत ''एनएसडीएल ई–मतदान सुविधेचा लाभ घेणे'' मध्ये असलेल्या टप्प्यांचा अवलंब करावा.

अंतिम मुदतीच्या तारखेला सदस्य नसलेल्या व्यक्तीने ही ईजीएमची सुचना फक्त माहितीसाठी आहे असे समजावे.

छापील/डिमॅट स्वरुपात कंपनीचे समभाग धारण करणाऱ्या आणि ज्यांनी कंपनीकडे/निबंधक आणि हस्तांतरण अभिकर्ता (''रजिस्ट्रार'')/डिपॉझिटरी सहभागी (''डिपीज'') यांच्याकडे त्यांचा ई–मेलचा पत्ता नोंदविलेला नाही/त्यात सुधारणा केली नाही, अशा कंपनीच्या सदस्यांना त्यांचा ई–मेलचा पत्ता नोंदविण्यासाठी/त्यात सुधारणा करण्यासाठी आणि दूरस्थ ई–मतदान पध्दतीने आणि ईजीएममध्ये ई–मतदान करण्यासाठी युजर आयडी आणि पासवर्ड मिळविण्यासाठी ई–मेल द्वारे secretarial@hccindia.com येथे, खालील दस्तऐवज/माहिती पाठविण्याची विनंती करण्यात येत आहे.

- कंपनीच्या रेकॉर्डस् मध्ये नोंदविण्यात आलेले नाव
- ई–मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक
- डीपीआयडी–क्लायंट आयडी, क्लायंट मास्टर कॉपी किंवा कॉपी ऑफ कन्सोलिडेटेड अकाउंट स्टेटमेंट (डिमॅट स्वरुपात केलेल्या समभागांसाठी)
- समभाग प्रमाणपत्राच्या पुढील आणि मागील बाजूची स्कॅन केलेली प्रत (छापील स्वरुपात धारण केलेल्या समभागांसाठी)
- पॅन आणि आधार कार्डची स्कॅन केलेली स्वयंप्रमाणित प्रत

जर एखाद्या सभासदाला ई–मतदानासंबंधी काही चौकशी करायची असेल, तर त्यांना www.evoting.nsdl.com येथील डाऊनलोड भागात असलेले 'सभासदांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न' (एफएक्युज) आणि 'सभासदांसाठी दूरस्थ ई–मतदानसंबंधी पुस्तिका' पाहण्याची विनंती करण्यात येत आहे किंवा 022–4886 7000 येथे संपर्क साधण्याची किंवा evoting@nsdl.com येथे विनंती पाठविण्याची सूचना करण्यात येत आहे. सदस्यांनी ई–मतदानासंबंधी काही प्रश्न असल्यास ते श्रीमती पल्लवी म्हात्रे, वरिष्ठ व्यवस्थापक, एनएसडीएल, 301, 3रा मजला, नमन चेंबर्स, जी ब्लॉक, प्लॉट नं. सी–३२, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–400 051; ई–मेल आयडी evoting@nsdl.com; संपर्क क्र.: 022–4886 7000 येथे संपर्क करावा.

ईजीएमच्या अगोदर किंवा दरम्यान एखाद्या सदस्याला लॉग इन करण्यासाठी काही तांत्रिक अडचणी आल्यास, त्यांनी एनएसडीएल हेल्प डेस्कला evoting@nsdl.com येथे विनंती पाठवावी किंवा 022–4886 7000 येथे संपर्क करावा.
अध्यक्ष किंवा त्यांनी लेखी स्वरुपात अधिकार दिलेल्या व्यक्तीने निष्कर्ष घोषित केल्यानंतर, स्क्रुटिनायजरच्या अहवालासह ते निष्कर्ष त्वरित कंपनीच्या संकेतस्थळावर www.hccindia.com येथे आणि एनएसडीएल यांच्या https://www.evoting.nsdl.com संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येतील. सदर निष्कर्ष स्टॉक एक्सचेंजेसच्या संकेतस्थळावर www.bseindia.com आणि www.nseindia.com येथे देखील अपलोड करण्यात येतील.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**हिंदुस्तान कंस्ट्रक्शन कं. लिमिटेड** करिता
सही/–
**नितेश कुमार झा**
कंपनी सचिव

दिनांक: फेब्रुवारी 19, 2025
**ठिकाण: मुंबई**

HCC
www.hccindia.com
हिंदुस्तान कन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: हिनकॉन हाऊस, लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई– ४०० ०८३. भारत
फोन: + 91 22 2575 1000 फॅक्स: +91 22 2577 7568
CIN: L45200MH1926PLC001228